

कोगनोळी : शाळेत सायबर सुरक्षेविषयी माहिती देताना सिद्धार्थ खोत. समोर विद्यार्थी.

# कोगनोळीतील शाळांमध्ये सायबर सुरक्षा जनजागृती

कोगनोळी, ता. २७ : येथील प्राथमिक शाळा व गर्ल्स हायस्कूलमध्ये धारवाड येथील शासकीय प्रथम श्रेणी महाविद्यालय व पुण्यातील क्विक हील फाउंडेशनच्या सहकार्याने सायबर सुरक्षेविषयी जनजागृती केली.

सिद्धार्थ खोत म्हणाले, सायबर गुन्ह्यांच्या वाढत्या धोक्यांविषयी जनजागृती करणे, डिजिटल युगात सुरक्षितता सुनिश्चित करणे आहे. कार्यक्रमाद्वारे ३० हजार लोकांना सायबर सुरक्षा आणि सायबर गुन्ह्यांविरुद्ध सुरक्षा याविषयी प्रशिक्षण देण्याचे उद्दिष्ट आहे. धारवाड शासकीय प्रथम श्रेणी महाविद्यालयातील विद्यार्थी बसवराज कोटबागी, अनिशा आणि रोहित बागेवाडी यांनी सायबर गुन्हे आणि ऑनलाईन सुरक्षिततेसाठी घ्यावयाची काळजी याबद्दल माहिती दिली. सायबर शिक्षणासाठी सायबर सुरक्षा या कार्यक्रमाबद्दल अधिक माहितीसाठी किंवा आगामी सत्रात सहभागी होण्यासाठी शासकीय प्रथम श्रेणी महाविद्यालय, धारवाडशी संपर्क साधण्याचे आवाहन सागर माणगावे यांनी केले.